# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५. **दूरध्वनी :** ०२२-२२१६ ३९६४/६५/६९

**फॅक्स :** ०२२-२२१६ ३९७६ **ई-मेल :** mercindia@mercindia.org.in **वेबसाईट :** www. mercindia.org.in


# मुंबईच्या उपनगरामध्ये विजेचे वितरण करण्यासाठी स्वारस्य अभिव्यक्तिसाठी आमंत्रण

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (आयोग) महाराष्ट्र राज्यात विद्युत क्षेत्रासंबंधात एक नियामक म्हणून कार्य करीत असून त्या अनुषंगाने आपले अधिकार वापरत आहे. ज्या व्यक्तींना राज्यात विजेचे पारेषण परवानेधारक, वितरण परवानेधारक आणि विजेचे व्यापारी म्हणून काम करण्यासाठी परवाना हवा असेल त्यांना विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६(१) (डी) सह कलम १४ अन्वये आयोगाने परवाना द्यावयाचा आहे.

रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड - आरइन्फ्रा {(पूर्वीची रिलायन्स एनर्जी लिमिटेड ''आरईएल'') ; बीएसईएस लि. ; बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिसिटी सप्लाय लिमिटेड (बीएसईएस)} ही मुंबईच्या उपनगरामध्ये विजेची निर्मिती, पारेषण, वहन आणि किरकोळ पुरवठा ही विद्युत क्षेत्रांशी संबंधित सर्व कामे करणारी एक कंपनी आहे. ३१ मार्च, २०१० रोजी आरइन्फ्राचे सुमारे ३८४ चौरस कि.मी.च्या कार्यक्षेत्रात २७.७४ लाख ग्राहक आहेत. आरइन्फ्रा तिच्या पुरवठ्याच्या क्षेत्रातील विविध ग्राहकांना - निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक ग्राहकांना तसेच रस्त्यावरील दिव्यांना विजेचा पुरवठा करते. मुंबईतील इतर वितरण परवानाधारकांच्या तुलनेत आरइन्फ्राच्या ग्राहकांची संख्या सर्वात जास्त आहे. आरइन्फ्राच्या एकूण ग्राहकांपैकी सुमारे ८५ टक्के ग्राहक निवासी ग्राहक, तर १४ टक्के वाणिज्यिक आणि उर्वरित ग्राहक ज्यामध्ये औद्योगिक ग्राहकांचा देखील समावेश आहे, ते फक्त १ टक्का आहेत. ज्या ग्राहकांचा विजेचा वापर दरमहा ३०० युनिटपेक्षा कमी आहे, अशा १९.५० लाख कमी उत्पन्न गटातील निवासी ग्राहकांना आरइन्फ्रा विजेचा पुरवठा करते.

मुंबईतील वितरण क्षेत्रात ग्राहकांना विजेचा पुरवठा करण्यासाठी आरइन्फ्राच्या पायाभूत विजेच्या जाळ्यात ३३/११ केव्हीची ६७ रिसिव्हींग स्टेशन्स, ५३८४ वितरण ट्रान्सफॉर्मर्स (११/०.४ केव्ही) स्टेशन्स आणि ८०८० सर्किट किलोमीटर लांबीच्या ३३ केव्ही, ११ केव्ही आणि लघुदाबाच्या वितरण जाळ्याचा समावेश होतो. सबंध विद्युत जाळे (६४ सर्किट किलोमीटर लांबीच्या जमिनीवरील वाहिन्या वगळून) हे जमिनीखालील केबल यंत्रणेच्या माध्यमातून करण्यात आले आहे आणि बहुतांश रिसिव्हींग स्टेशन्स आणि वितरण ट्रान्सफॉर्मर उपकेंद्रे ही इमारतींमध्ये आहेत. आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये ९४८४ दशलक्ष युनिटचा ऊर्जा पुरवठा वितरण यंत्रणेला करण्यात आला होता. मागील पाच वर्षांमध्ये, ग्राहकांची संख्या ५.०६% या एकत्रित वार्षिक वाढीच्या दराने (सीएजीआर) वाढली आहे. आर्थिक वर्ष २००९-१० मध्ये १०.०८ टक्के वितरण हानी होती.

द बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिक लायसन्स १९२६ हा तत्कालीन मुंबई सरकारने ''किलिक, निक्सन आणि कंपनी'' या भागिदारी फर्मला भारतीय विद्युत अधिनियम, १९१० खाली विजेचा पुरवठा करण्यासाठी दिलेला परवाना होता. हा परवाना नंतर बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिसिटी सप्लाय लिमिटेड यांच्याकडे निहित झाला. या कंपनीने तिचे नाव बीएसईएस लिमिटेड म्हणून, नंतर आरईएल म्हणून आणि त्यानंतर रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरइन्फ्रा) म्हणून बदलले. द बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिक लायसन्स १९२६ आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (रिलायन्स एनर्जी लिमिटेड यांना लागू असलेल्या वितरण परवान्याच्या विशिष्ट अटी) विनियम, २००८ खाली आरइन्फ्राचा सदर परवाना १५ ऑगस्ट, २०११ पर्यंत वैध आहे.

आयोगाने, सन २००९ च्या प्रकरण क्र. ४० मधील दि. १५ मार्च २०१० च्या आदेशाद्वारे, इतर बाबींबरोबर, आरइन्फ्राच्या वितरण परवाना आणि वितरण यंत्रणेमधील मालमत्तांचे हस्तांतरण रिलायन्स एनर्जी लिमिटेड यांच्या नावे अभिहस्तांकित करण्यास मंजूरी दिली आणि पारेषण परवाना आणि पारेषण वाहिन्यांमधील पारेषण मालमत्तांचे हस्तांतरण रिलायन्स पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड यांच्या नावे अभिहस्तांकित करण्यास मंजूरी दिली. पारेषण यंत्रणा ही डहाणूपासून वीज वाहून नेण्यासाठी आहे आणि त्यामध्ये मुंबई उपनगरातील विविध विद्युत भार केंद्रांना जोडलेल्या पारेषण वाहिन्यांचा समावेश होतो. डहाणू येथील विद्युत निर्मिती संयत्रणाची क्षमता ५०० मेगावॅट (प्रत्येकी २५० मेगावॅटची दोन युनिट्स) १९९५ पासून कार्यान्वित आहे. डहाणू येथे निर्माण केलेली सर्व वीज आरइन्फ्राच्या वितरण परवाना क्षेत्राला पुरविण्यात येते.

आयोग, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम ८६ (१) (डी) सह कलम १४ अन्वये, वीज वितरणाच्या कामात तज्ज्ञ असलेल्या संभाव्य अर्जदारांकडून कन्सोर्टिअम/जॉइंट व्हेंचरसह, आरइन्फ्राच्यावर उल्लेखिलेल्या मुंबईच्या उपनगरातील वीज पुरवठ्याच्या क्षेत्रात वीज वितरणाचे काम करण्यासाठी आणि त्यासंबंधात वितरण परवाना मिळविण्यासाठी, स्वारस्याची अभिव्यक्ती कळविण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

इच्छुक अर्जदारांनी 'स्वारस्याची अभिव्यक्ती' कळविताना ते सेवा देण्यासाठी पात्र आहेत हे दाखविणाऱ्या त्यांच्या क्षमता व अनुभव या संबंधीचे एक विवरणपत्र (माहिती पत्रक, यासारख्या करीत असलेल्या कामाचा तपशील, सारख्याच परिस्थितील कामाचा अनुभव, योग्य कुशलता असलेल्या कर्मचाऱ्यांची उपलब्धता इ.) पाठवावे. तसेच, त्यांची अधिकारपत्रे दाखविणारा अन्य तपशील पाठवावा ज्यात संस्थेची संरचना, कार्यालयांची संख्या, मनुष्यबळ व वित्तीय दर्जा समाविष्ट असेल. इच्छुक अर्जदारांनी त्यांच्या कंपनीची रुपरेखा आणि त्यांच्या मागील १० वर्षांतील कामगिरीची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे सादर करावी.

१. इच्छुक अर्जदाराचे नाव आणि पत्ता
   - अ. संस्थेचा प्रकार व स्थापन झाल्याचे वर्ष
   - ब. कायदेशीर दर्जा
   - क. नोंदणी/संलग्नीकरण
   - ड. कोलॅबोरेशन/जॉइंट व्हेंचर (असल्यास)

२. अशाच कामातील अनुभव व केलेल्या कामाची व्याप्ती

३. सविस्तर प्रशिक्षण अनुभव/वीज वितरण व्यवसायाचा अनुभव

४. मागील तीन वर्षांच्या ताळेबंदांच्या प्रती

५. सविस्तर रुपरेखा/कर्मचाऱ्यांची (राष्ट्रीय आणि आंतर-राष्ट्रीय) वैयक्तिक माहिती (सीव्ही)

स्वारस्याची अभिव्यक्ती सादर करताना आंतर-राष्ट्रीय/राष्ट्रीय बोलीदार त्यांना ज्या क्षेत्रात काम करण्याची इच्छा आहे अशा क्षेत्रातील क्षमता वाढविण्यासाठी अन्य व्यक्ती/संस्थांबरोबर सहभागी होऊ शकतील.

इच्छुक व्यक्ती/संस्थांना, त्यांची स्वारस्याची अभिव्यक्ती, क्षमता आणि अनुभव दर्शविणाऱ्या माहितीसह, खालील पत्त्यावर **दिनांक ४ नोव्हेंबर, २०१० रोजी संध्याकाळी ४.०० वाजेपर्यंत** मिळेल अशा रितीने पाठविण्याची, विनंती करण्यात येत आहे.

सचिव,

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,**

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४००००५.

या संबंधी कोणतीही माहिती हवी असल्यास, संभाव्य बोलीदार रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड या कंपनीशी खालील पत्त्यावर संपर्क साधू शकतील.

**रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड,**

रिलायन्स एनर्जी सेंटर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई ४०००५५.

त्याचप्रमाणे आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत-स्थळावरुन देखील माहिती घेता येईल.

कोणत्याही इच्छुक व्यक्तीचा अर्ज, कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क आयोग राखून ठेवीत आहे.

**आयोगाच्या आदेशावरुन,**

**सही/-**

**(के. एन. खवारे)**

**सचिव, मविनिआ**

**मुंबई**

**दिनांक : ०६.१०.२०१०**